# <u>अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग</u>

## तहसिल कार्यालय अमरावती
## (पुरवठा विभाग)

❖ **विभागामध्ये कार्यरत पदे:-**

- **निरिक्षण अधिकारी:-** कु. चैताली अजय यादव
- **अव्वल कारकून/ पुरवठा निरीक्षक:-** रिक्त
- **गोदाम व्यवस्थापक:-**श्री .सिद्धार्थ वानखडे
- **कनिष्ठ लिपिक शिधापत्रिका:-** कु . प्रीती घोडे
- **कनिष्ठ लिपिक लेखा:-** रिक्त
- **शिपाई :-** रिक्त

❖ **पुरवठा विभागामध्ये कार्यरत पदांची कर्तव्यसूची**:-

**1) निरीक्षण अधिकारी** :-

- तालुक्यामध्ये राबविल्या जाणाऱ्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे.
- तालुक्यातील रास्तभाव दुकानदारांना महिनानिहाय धान्याचे नियतन मंजूर करणे.
- रास्तभाव दुकानदारांच्या धान्य वितरणावर लक्ष ठेवणे.
- रास्तभाव दुकान , गोदाम, गॅस एजन्सी, हॉटेल आस्थापणे, पेट्रोल पंप यांची तपासणी करणे.
- तालुक्यातील लाभार्थींना शिधापत्रिकांचे वितरण करणे.
- कार्यालयीन कामकाजावर नियंत्रण ठेवणे.
- वरिष्ठ कार्यालयामध्ये सर्व अहवाल सादर करणे.

**2 )गोदाम व्यवस्थापक** :-

- गोदामास प्राप्त धान्याची आवक घेणे.
- गोदामामधून सर्व रास्तभाव दुकानदारांना प्राप्त नियतनानुसार धान्याचे वितरण करणे
- गोदामामधून वितरीत केल्या जाणाऱ्या धान्याचे लेखे तयार करून वरिष्ठ कार्यालयास सादर करणे.
- गोदाममधील धान्याची प्रतवारी करणे.

**3) अव्वल कारकून:-**

- पुरवठा विभागातील पत्रव्यवहार करणे.
- दरमहा रास्तभाव दुकान निहाय धान्याचे नियतन तयार करणे.

- रास्तभाव दुकानदारांकडून धान्याच्या चलानचा भरणा करून घेणे.
- वरिष्ठ कार्यालयाला वेळोवेळी अहवाल पाठविणे.

**4)कनिष्ठ लिपिक शिधापत्रिका**:-

* कार्यालयात प्राप्त अर्जदारांना शिधापत्रिकांचे वितरण करणे.

* सर्व शिधापत्रिकांची ऑनलाइनची कामे करणे.

* शिधापत्रिकांच्या चलानाचा भरणा करणे .

**5) कनिष्ठ लिपिक लेखा :-**

* पुरवठा विभागामधून वितरित करण्यात येणाऱ्या धान्याचे संपूर्ण लेखे (PLA7, PLA2, R विवरणपत्र)तयार करणे.

* कार्यालयातील लेखेविषयक बाबी पाहणे.

* सर्व लेखे वरिष्ठ कार्यालयास सादर करणे.

❖ **पुरवठा विभागमधील लाभार्थींची योजनानिहाय माहिती:-**

| अ.क्र. | योजनेचे नाव | कार्ड संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| 1 | अंत्योदय अन्न योजना | 5895 | 21627 |
| 2 | प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजना | 22462 | 92410 |
| 3 | शेतकरी लाभार्थी योजना | 3201 | 12418 |
| 4 | NPH | 1367 | 4761 |

**विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा**

1. नविन शिधापत्रिका उपलब्ध करुन देणे
2. शिधापत्रिकेतील नाव कमी करणे अथवा समाविष्ट करणे
3. दुय्यम शिधापत्रिका उपलब्ध करुन देणे
4. जनआरोग्य योजनेस पात्र लाभार्थ्यांना वैद्यकिय प्रमाणपत्र देणे.

**<u>पुरवठा विभागातील योजना</u>**-

**1.अंत्योदय अन्न योजना-**

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शा.नि.क्र.शीवाप-2013/प्र.क्र.286/ना.पू.28 दिनांक-17/07/2013 अन्वये, अंत्योदय अन्न योजना कार्यन्वीत करण्यात आली.

1) ज्या कुटुंबाचे प्रमुख विधवा स्त्रिया अथवा आजारी व अपंग किंवा ६० वर्षे वयावरील वृद्ध आहेत व ज्यांना उदरनिर्वाहाचे निश्चित साधन नाही अथवा सामाजिक आधार नाहीत
2) दुर्धरआजार ग्रस्त अपंग/ विधवा/ आदिम आदिवासी कुटुंबे, भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी, ग्रामीण कारागीर ,कुष्ठरोगी कुटुंबप्रमुख असणारी व्यक्ती.

**2. प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजना-**

अ) ज्या कुटुंबाचे एकुण उत्पन्न (ग्रामिण ४४,०००/- व शहरी ५९,०००/-) च्या आत असणारी कुटुंब.

**3. ए.पि. एल. शेतकरी लाभार्थी योजना**

सदर योजना आत्महत्याग्रस्त शेतकरी कुंटुंबाकरीता कार्यरत करण्यात आली असून, शासनामार्फत प्रती लाभार्थी १६० रु प्रमाणे डीबीटी प्रणालीदवारे कुटुंबप्रमुख महीला यांच्या बॅक खात्यात जमा केली जाते.

**4.कल्याणकारी संस्था व वस्तीगृह योजना**

वस्तीगृहातील विद्यार्थ्यांकरीता सदर योजना राबविली जाते.

**<u>लोकसेवा हक्क अधिनियम 2015 अंतर्गत विभागामार्फत अधिसूचित केलेल्या सेवा व कालावधी-</u>**

| अ. क्र | अधिसूचित सेवा | अधिसूचित सेवेचा विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| 1 | १.नवीन शिधापत्रिका मागणी | ३० दिवस |
| 2 | शिधापत्रीकेतील नावात दुरुस्ती | १ दिवस |
| 3 | शिधापत्रिकेत नावे समाविष्ट करणे / नाव वाढविणे | लहान मुलांचे १ दिवसात व १८ वर्षावरील नाव वाढ ३०दिवस |
| 4 | शिधापत्रीकेवरील पत्ता बदल करणे | ३० दिवस |
| 5 | दुय्यम शिधापत्रिका ( खराब / फाटलेली इत्यादी ) | गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ०६ दिवस ३०दिवस |
| 6 | दुय्यम शिधापत्रिका ( गहाळ शिधापत्रिका ) | गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ०६ दिवस ३०दिवस |
| 7 | नवीन रास्त भाव दुकानाची मंजुरी | जाहिरनामा काढल्यानंतर १८०दिवस |
| 8 | रास्त भाव दुकानाच्या परवान्याचे नुतनीकरण | 60 दिवस |
| 9 | किरकोळ रोकेल विक्री परवाने | 60 दिवस |
| 10 | किरकोळ रॉकेलविक्री परवान्याचे नुतनीकरण | 60 दिवस |

| | | |
|---|---|---|
| 11 | शिधापत्रीके मधील नाव कमी करणे | १ दिवस |

**1.नवीन रेशन कार्ड काढण्याकरिता आवश्यक कागदपत्रे**

i) नमुना एक छापील अर्ज

ii) आधार कार्ड

iii) रहिवासी दाखला/ घरटॅक्स पावती / इलेक्ट्रिक बिल

iv) उत्पन्नाचा दाखला (नायब तहसीलदार)

v) नाव कमी केल्याचे प्रमाणपत्र

vi) कार्ड नसल्याबाबत प्रतिज्ञालेख

**2.दुय्यम राशन कार्ड काढण्याकरिता आवश्यक कागदपत्रे**

i) अर्ज

ii) रेशनकार्डमध्ये समाविष्ट असलेले सर्व सदस्यांचे आधार कार्डाची प्रत

iii) जुने रेशन कार्ड

iv) रेशनकार्ड हरवले असल्यास, रास्तभाव धान्य दुकानाचा दाखला

v) रेशन कार्ड नसल्यास कार्ड नसल्यास प्रतिज्ञालेख

**3.नाव समाविष्ट किंवा कमी करण्याकरिता आवश्यक कागदपत्रे**

i) अर्ज

ii) मूळ रेशन कार्ड

iii) आधीच्या रेशनकार्ड मधुन नाव कमी केल्याचे प्रमाणपत्र (नाव समाविष्ट करणेकरीता आवश्यक)

iv) आधार कार्ड

**<u>नाविण्यपुर्ण उपक्रम-</u>**

**1.अभीप्राय नोंदवही**-

विभागातील कामकाजामध्ये अधीक पारदर्शकता यावी याकरीता अभीप्राय नोंदवही ठेवण्यात आली आहे, यामध्ये कार्यालयास दरदिवशी भेट देणाऱ्या लाभार्थ्यांचे अभीप्राय नोंदविले जाते, जेणेकरुन ग्राहकांच्या समस्या, अडचणी यांचे निराकरण होण्यास व कामकाज गतिमान होण्यास मदत होते.

**2. अपात्र शीधापत्रिका शोधमोहीम-**

अपात्र शीधापत्रिका शोधमोहीम राबविण्यात येत आहे ज्यामुळे पात्र, गरजु तसेच वंचित लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ घेणे शक्य होईल.

**3. ग्रामदक्षता समितीचे आयोजन-**

ग्रामदक्षता समितीचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामुळे विभागातील वेगवेगळया योजनांमध्ये समाविष्ट असणाऱ्या अपात्र शीधापत्रिकाधारकांचा शोध घेउन सदर शीधापत्रिका रदद करण्यात येउन पात्र लाभार्थ्यांपर्यत लाभ पोहचण्यास सहकार्य होत आहे.

4. **“Mera E-KYC APP”**-

E-KYC करण्याकरीता लाभार्थ्यांच्या सोयीसाठी राज्यशासनाने **Mera E-KYC** हे ॲप सुरू केले आहे. यामुळे लाभार्थ्यांना प्रत्यक्ष रास्त भाव दुकानावर न जाता घरबसल्या ई-केवायसी पूर्ण करता येईल.

https://play.google.com/store/apps/details

नमुना नऊ ( अर्जाची किंमत : दोन रुपये)

क्षेत्र/ गाव ..................................................................................शिधावाटप क्षेत्र/ तालुका..........................................................

कौटुंबीक शिधापत्रिकेतील युनिट्स कायम स्वरुपात कमी करण्याकरिता अर्ज No. x y z

अनुक्रमांक............

ताकीद.- (१) कोणतेही खोटे निवेदन केल्यास आणि ते खोटे असल्याचे आढळून आल्यास त्याबद्दल शिक्षा होईल.
(२)अर्जात देण्यात आलेली काणतीही माहीती खोटी असल्याचे आढळून आल्यास शिधापत्रिका रद्द करण्यात येईल.
(३)हा अर्ज सादर करताना कौटुंबीक शिधापत्रिका सादर करावी.

मी, (नाव, प्रथम आडनाव).................................................................... वय ...............

पूर्ण निवासी पत्ता.......................................................................................................................................
.............................................................................................................................................

दुकान क्रमांक ......................संदर्भ क्रंमांक..................येथे नोंदविण्यात आलेली माझी शिधापत्रिका क्रमांक............................
मधून पुढील इसमांची नावे वगळण्याकरिता अर्जकरीत आहे.

| नाव<br>(अ) | अर्जदाराशी नाते<br>(ब) | वय<br>(क) | व्यवसाय<br>(ड) | निघून गेल्याची किंवा मृत्यूची तारीख<br>(इ) | निघून जाण्याबाबतीत विद्यमान निवासाचे ठिकाण<br>(फ) |
|---|---|---|---|---|---|
| १...... | | | | | |
| २...... | | | | | |
| ३...... | | | | | |
| ४...... | | | | | |
| ५...... | | | | | |
| ...... | | | | | |

मी असे जाहिर करतो की, वर करण्यात अलेले सर्व निवेदने ही माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे बरोबर आहेत.

दिनांक ..................

अर्जदाराची सही

.......................प्रौढांची आणि मुलांची संख्या कमी करण्यास परवानगी देण्यात येत आहे. युनिटांची संख्या.....................युनिटपासून ............................
युनिटपर्यत कमी करण्यात यावी.

शिधावाटप अधिकारी

....................................

सहायक शिधावाटप अधिकारी.

---

नमुना नऊ No. x y z

(स्थळप्रत)

शिधावाटप क्षेत्र/ गाव

शिधापत्रिका क्रमांक ...............................................नोंदणी क्रमांक. .................................................................................

यामधून खालील इसमांची नावे संदर्भ क्रमांक .......................................................................................

१................................................................... ४..........................................................................................

२................................................................... ५. ........................................................................................

३................................................................... ६...........................................................................................

आणि.................पासून ..........................पर्यत युनिट्स कमी करण्यात आली आहेत.

शिधावाटप अधिका-याची सही

..................................................

सहायक शिधावाटप अधिका-याची सही.

टीप : राज्याच्या दुस-या शिधवाटप क्षेत्रामध्ये नवीन शिधापत्रिकेसाठी किंवा जुन्या कौटुंबीक पत्रिकेमध्ये नावे नमूद करण्यासाठी किंवा नवीन शिधापत्रिका प्राप्त करण्यासाठी ही स्थळप्रत सादर करण्यात आली पाहिजे.